महाराष्ट्र शासन

एमएसआरएलएम/प्र.क्र. १६३/जा.क्र३०४/२०१३
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
ऑफिस नं. १०१ व १०२, पहिला मजला,
मोनार्च प्लाझा, प्लॉट नं. ५६, सेक्टर-११
सीबीडी बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४
दिनांक : २० /०३/२०१३

वाचा : १. शासन निर्णय क्रमांक एनआरएलएम-२०११/प्र.क्र.१९६/योजना -३ ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक १८/०७/२०११

२. राज्यस्तरीय नियंत्रण समिती सभेचे इतिवृत्त दिनांक १५ मार्च २०१२

३. राज्यस्तरीय कार्यकारी समिती सभेचे इतिवृत्त दिनांक १५ सप्टेंबर २०१२

आदेश ३.८

विषय : महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता, प्रवास भत्ता, दैनिक भत्ता, घरभाडे व इतर अनुषांगिक भत्ते अनुज्ञेय करणेबाबत...

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची प्रभावी अमंलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ग्रामविकास विभागातंर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० च्या अधिनियम २१) अन्वये नोंदणी करण्यात आली आहे. शासन निर्णय क्रमांक एनआरएलएम-२०११/प्र.क्र.१९६/योजना -३ ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक १८/०७/२०११ व दिनांक ९ नोव्हेबर २०१२ रोजी संपन्न राज्यस्तरीय नियंत्रण समिती सभेत दिलेल्या मंजूरी नुसार राज्य, जिल्हा व तालुका मिशन व्यवस्थापन कक्षामध्ये पदे भरण्यात येत आहेत. अभियानाचे काम हे *मिशन मोड* मध्ये करावयाचे आहे. अभियानाचे मुख्यालय हे मुंबई येथे असल्याने तुलनेने निवास व प्रवास महाग पडत असल्याने तसेच अभियानातंर्गत रुजू झालेले अधिकारी व कर्मचा-याचा उत्साह टिकवून ठेवण्यासाठी आणि नविन अधिकारी व कर्मचा-याची अभियानात रुजू होण्यासाठी आकर्षित करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन भत्ता, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता निश्चित करण्यासाठी दिनांक १५ सप्टेंबर २०१२ रोजीच्या राज्यस्तरीय कार्यकारी समितीने बैठकीत विषय क्र. ५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार खालील भत्ते अदा करण्यासाठी आदेश निर्गमित करण्यात येत आहेत. खालील भत्ते फक्त Intensive पध्दतीने प्रथम टप्प्यात काम सुरु झालेले १० जिल्हे व १५ तालुक्यासाठी लागु राहतील. टप्या-टप्याने तालुक्यांचा समावेश केला जाईल. त्यानुसार नव्याने आदेश निर्गमित केले जातील.

अ) प्रोत्साहन भत्ता

अभियानातंर्गत प्रतिनियुक्तीने उपलब्ध होणा-या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी *मिशन मोड* मध्ये कार्य करावे लागणार आहे. यासाठी त्यांनी यांचा उत्साहन टिकवून ठेवावा यास्तव त्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी प्रोत्साहन भत्ता पूर्वलक्षी प्रभावाने संबंधित अधिकारी अभियान कक्षात रुजू झालेल्या दिनांकापासून खालीलप्रमाणे लागू करण्यात

येत आहे. सदरील प्रोत्साहन भत्ता हा Intensive पध्दतीने राबविण्यात येणारे जिल्हे व तालुक्यांसाठी लागु राहील.

अ.क्र.	पदाचे नाव	प्रोत्साहन भत्ता दर
१.	अभियान महासंचालक	(Basic + Grade Pay + D.A) च्या १०%
२.	मुख्य कार्यकारी अधिकारी, MSRLM	(Basic + Grade Pay + D.A) च्या २५%
३.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	(Basic + Grade Pay + D.A) च्या १०%
४.	उपसचिव (योजना) ग्रामविकास विभाग	(Basic + Grade Pay + D.A) च्या १०%
५.	अतिरिक्त संचालक, MSRLM	(Basic + Grade Pay + D.A) च्या २५%
६.	उप संचालक	(Basic + Grade Pay + D.A) च्या २५%
७.	प्रकल्प संचालक, DRDA	(Basic + Grade Pay + D.A) च्या १०%
८.	राज्य समन्वयक	(Basic + Grade Pay + D.A) च्या २५%
९.	जिल्हा कार्यक्रम व्यवथापक	(Basic + Grade Pay + D.A) च्या २५%
१०.	जिल्हास्तरीय तज्ञ	(Basic + Grade Pay + D.A) च्या २५%
११.	तालुका कार्यक्रम व्यवस्थापक	(Basic + Grade Pay + D.A) च्या २५%
१२.	तालुकास्तरीय तज्ञ	(Basic + Grade Pay + D.A) च्या २५%
१३.	वर्ग ३ मधील कर्मचारी	(Basic + Grade Pay + D.A) च्या १०%
१४.	वर्ग ४ मधील कर्मचारी	(Basic + Grade Pay + D.A) च्या १०%

ब) घरभाडे प्रतिपूर्ती

राज्य मिशन व्यवथापन कक्षात शासकीय अधिकारी प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत यांना शासकीय निवास्थान उपलब्ध झालेले नाही व ते भाड्याच्या घरात राहत आहेत त्यांना खालील प्रमाणे घरभाडे प्रतिपूर्ती मंजूर करण्यात येत आहे. सदरील मर्यादा ही कमाल मर्यादा असून प्रत्यक्षात अदा करण्यात येणा-या घरभाड्यानुसार घरभाड्याची प्रतिपूर्ती केली जाईल. अशा पध्दतीने घरभाडे प्रतिपुर्ती केली जाणा-या अधिका-यांना वेगळ्याने HRA देय राहणार नाही. जर शासकीय अधिकारी स्वतःच्या मालकीच्या घरात राहत असतील तर त्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे नियमित घरभाडे भत्ता देय राहील.

अ.क्र.	पदाचे नाव	घरभाडे प्रतिपूर्ती कमाल मर्यादा
१.	मुख्य कार्यकारी अधिकारी, MSRLM	७५% (Basic + Grade Pay + D.A.)
२.	अतिरिक्त संचालक, MSRLM	७५% (Basic + Grade Pay + D.A.)
३.	उप संचालक	५०% (Basic + Grade Pay + D.A.)
४.	राज्य समन्वयक	५०% (Basic + Grade Pay + D.A.)

क) निवासी शिपायाऐवजी रोख परतावा

राज्य मिशन व्यवथापन कक्षात शासकीय अधिकारी नियुक्तीने अथवा प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत त्यांना शासन निर्णय क्रमांक चवक्र-१४१०/प्र.क्र. ११/सेवा-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १२ ऑगस्ट २०१० अन्वये खालील अधिकाऱ्यांना निवासी शिपायाऐवजी रोख परतावा देय आहे. तरी खालील अधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे दरमहा पगारासोबत निवासी शिपायाऐवजी रोख परतावा मंजूर करण्यात येत आहे. सदरील भत्ता हा दरमहा पगारासोबत अदा करण्यात येईल.

अ.क्र.	पदाचे नाव	निवासी शिपाया ऐवजी रोख परतावा दर
१.	मुख्य कार्यकारी अधिकारी, MSRLM	महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतनाच्या नियमानुसार अदा केला जाईल.
२.	अतिरिक्त संचालक, MSRLM	

इ) वृत्तपत्र व मासिक भत्ता

राज्य मिशन व्यवथापन कक्षात खालील शासकीय अधिकारी प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत त्यांना शासन निर्णय क्रमांक विअप्र-१०.०५/प्र.क्र. १६/०५/ विनिमय, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १४ जुलै २००५ अन्वये वृत्तपत्र व मासिक भत्ता देय आहे तरी त्यांना खालीलप्रमाणे वृत्तपत्र व मासिक भत्ता मंजूर करण्यात येत आहे. सदरील भत्ता हा दरमहा पगारासोबत अदा करण्यात येईल.

अ.क्र.	पदाचे नाव	वृत्तपत्र व मासिक भत्ता दर
१.	मुख्य कार्यकारी अधिकारी, MSRLM	दरमहा रु २५० /-
२.	अतिरिक्त संचालक, MSRLM	

ई) मोबाईल भत्ता

अभियानातंर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना खालील प्रमाणे मोबाईल भत्ता देय करण्यात येत आहे. सदरील भत्ता हा त्यांच्या दरमहा पगार / मानधनासोबत अदा करण्यात येईल.

अ.क्र.	पदाचे नाव	दरमहा देय मोबाईल भत्ता
१.	मुख्य कार्यकारी अधिकारी, MSRLM	रु २०००/-
२.	अतिरिक्त संचालक, MSRLM	रु २०००/-
३.	उप संचालक	रु २०००/-
४.	राज्य समन्वयक	रु २०००/-
५.	जिल्हा कार्यक्रम व्यवथापक	रु १०००/-
६.	जिल्हास्तरीय तज्ञ	रु १०००/-
७.	तालुका कार्यक्रम व्यवस्थापक	रु १०००/-
८.	तालुकास्तरीय तज्ञ	रु १०००/-
९.	क्लस्टर को-ऑर्डिनेटर	रु ५००/-
१०.	वर्ग ३ मधील कर्मचारी	रु ५००/-
११.	वर्ग ४ मधील कर्मचारी	रु ३००/-

उ) प्रवासाच्या सवलती व मर्यादा (विमान, रेल्वे व इतर प्रवास)

अभियानातंर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना खालील प्रमाणे प्रवास करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	विमान प्रवास	रेल्वे प्रवास
१.	अभियान महासंचालक	मान्य	शासकीय नियमानुसार लागु
२.	मुख्य कार्यकारी अधिकारी, MSRLM	मान्य	शासकीय नियमानुसार लागु
३.	अतिरिक्त संचालक, MSRLM	मान्य	शासकीय नियमानुसार लागु
४	उपसचिव (योजना)	NRLM च्या बैठका , दौरे, प्रशिक्षण व कार्यशाळेसाठी उपस्थित राहण्यासाठी मान्य	शासकीय नियमानुसार लागु
५	उप संचालक	२ पेक्षा जास्त विमान प्रवासास मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांची पूर्व परवानगी आवश्यक	शासकीय नियमानुसार लागु
६	राज्य समन्वयक		वातानुकुलित व्दितीय वर्ग शयनयान प्रवास
७	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	NRLM च्या बैठका, दौरे, प्रशिक्षण व कार्यशाळेसाठी उपस्थित राहण्यासाठी मान्य	शासकीय नियमानुसार लागु
८	प्रकल्प संचालक, DRDA		शासकीय नियमानुसार लागु

९	जिल्हा कार्यक्रम व्यवथापक	रेल्वेचे तिकीट उपलब्ध नसल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या पुर्वपरवानगीने मान्य	वातानुकुलित व्दितीय वर्ग शयनयान प्रवास
१०	जिल्हास्तरीय तज्ञ		वातानुकुलित व्दितीय वर्ग शयनयान प्रवास
११	तालुका कार्यक्रम व्यवस्थापक	रेल्वेचे तिकीट उपलब्ध नसल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या पुर्वपरवानगीने मान्य	वातानुकुलित तिसरा वर्ग शयनयान प्रवास
१२	तालुकास्तरीय तज्ञ		वातानुकुलित तिसरा वर्ग शयनयान प्रवास
१३	क्लस्टर को-ऑर्डिनेटर		वातानुकुलित तिसरा वर्ग शयनयान प्रवास
१४	वर्ग ३ मधील कर्मचारी	लागु नाही	व्दितीय शयनयानाने प्रवास
१५	वर्ग ४ मधील कर्मचारी	लागु नाही	व्दितीय शयनयानाने प्रवास

ऊ) हॉटेल मधील निवास व्यवस्थेसाठी अनुज्ञेय दर, दैनिक भत्ता व स्थानिक प्रवास

अभियानातंर्गत विविध कामासाठी अधिकारी व कर्मचा-यांना नियमित दौरे करावे लागतात. या दौ-यांच्या दरम्यान त्यांना मुक्काम, दैनिक भत्ता व स्थानिक प्रवास इत्यादीसाठी खालील प्रमाणे दर अनुज्ञेय करण्यात यते आहेत. खालील निवास/मुक्कामाचे दर कमाल मर्यादा दर्शवितात. निवास/मुक्कामासाठी प्रत्यक्षात होणारा खर्च कमाल मर्यादेच्या अधिन राहून अदा केला जाईल. यासाठी संबंधितास निवास व्यवस्थेसाठी झालेल्या खर्चाचे प्रमाणक स्वसाक्षांकित व प्रमाणित करुन सादर करावे लागेल. जेवण व दैनिक भत्त्याची रक्कम एकत्रित अदा केली जाईल. जेवणाची व्यवस्था संबंधित संस्था/कार्यालय/विभाग/प्रशिक्षण संस्था यांनी केली असल्यास जेवण व दैनिक भत्त्याची ५०% रक्कम अनुज्ञेय राहील. खालील तक्त्याप्रमाणे स्थानिक प्रवासासाठी होणार खर्च अनुज्ञेय राहील. यासाठी संबंधितास स्थानिक प्रवासासाठी झालेल्या खर्चाचे प्रमाणक स्वसाक्षांकित व प्रमाणित करुन सादर करावे लागेल. प्रत्येक महिन्याच्या दौरा नियोजनासाठी सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी सोबत जोडलेले प्रपत्र 'अ' मध्ये संभाव्य दौरा कार्यक्रम व दौरा पूर्ण झाल्यानंतर महिना अखेरीस दौरा प्रतिपूर्ती अहवाल प्रपत्र 'ब' मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

अ.क्र	पदाचे नाव	दैनिक भत्ता				मुख्यालयात प्रवासादरम्यान देय दैनिक भत्ता		स्थानिक प्रवास खर्चाची मर्यादा
		महानगरे (दिल्ली, मुंबई, बेंगलोर,चेन्नई, हैद्राबाद, कोलकत्ता,जयपूर,पुणे,नागपूर, औरंगाबाद आणि राजधानी असणारे शहरे		इतर शहरे		मुख्यालयाचे ठिकाण	दैनिक भत्त्याचे दर (रु.)	
		निवास/ मुक्काम दर (प्रत्यक्ष खर्चानुसार) (रु.)	जेवण, आऊट ऑफ़ पॉकेट इ. (एकत्रित) (रु.)	निवास/ मुक्काम दर (प्रत्यक्ष खर्चानुसार) (रु.)	जेवण, आऊट ऑफ़ पॉकेट इ. (एकत्रित) (रु.)			
१.	अभियान महासंचालक	१०,०००/-	१,५००/-	७,५००/-/	१,०००/-	--	--	प्रत्यक्षात झालेला खर्च
२.	मुख्य कार्यकारी अधिकारी, MSRLM	७,५००/-	१,०००/-	५,०००/-	१,०००/-	मुंबई मध्ये	३००/-	प्रत्यक्षात झालेला खर्च
३.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	७,५००/-	१,०००/-	५,०००/-	१,०००/-	--	--	प्रत्यक्षात झालेला खर्च
४.	उपसचिव (योजना) ग्रामविकास विभाग	७,५००/-	१,०००/-	५,०००/-	१,०००/-	--	--	प्रत्यक्षात झालेला खर्च
५.	अतिरिक्त संचालक, MSRLM	७,५००/-	१,०००/-	५,०००/-	१,०००/-	मुंबई मध्ये	३००/-	प्रत्यक्षात झालेला खर्च
६.	उप संचालक	५,०००/-	१,०००/-	३,५००/-	१,०००/-	मुंबई मध्ये	३००/-	प्रत्यक्षात झालेला खर्च
७.	प्रकल्प संचालक, DRDA	५,०००/-	१,०००/-	३,५००/-	१,०००/-	--	--	प्रत्यक्षात झालेला खर्च
८.	राज्य समन्वयक	५,०००/-	१,०००/-	३,५००/-	१,०००/-	मुंबई मध्ये	३००/-	प्रत्यक्षात झालेला खर्च
९.	जिल्हा कार्यक्रम व्यवथापक	३,०००/-	७५०/-	१,५००/-	७५०/-	संबंधित जिल्ह्यात	२००/-	प्रत्यक्षात झालेला खर्च

१०.	जिल्हास्तरीय तज्ञ	३,०००/-	७५०/-	१,५००/-	७५०/-	संबंधित जिल्ह्यात	२००/-	प्रत्यक्षात झालेला खर्च
११.	तालुका कार्यक्रम व्यवस्थापक	२,०००/-	७५०/-	१,०००/-	७५०/-	संबंधित जिल्ह्यात	१५०/-	लागु नाही
१२.	तालुकास्तरीय तज्ञ	२,०००/-	७५०/-	१,०००/-	७५०/-	संबंधित जिल्ह्यात	१५०/-	लागु नाही
१३.	क्लस्टर को-ऑर्डिनेटर	१,५००/-	५००/-	१,०००/-	७५०/-	संबंधित जिल्ह्यात	१००/-	लागु नाही
१४.	वर्ग ३ मधील कर्मचारी	५००/-	५००/-	५००/-	५००/-	संबंधित जिल्ह्यात (SMMU मधील कर्मचा-यासाठी मुंबई)	१००	प्रत्यक्षात झालेला खर्च
१५.	वर्ग ४ मधील कर्मचारी	३००/-	३००/-	३००/-	३००/-	संबंधित जिल्ह्यात I(SMMU मधील कर्मचा-यासाठी मुंबई)	१००	प्रत्यक्षात झालेला खर्च

ए) विमा संरक्षण

अभियानातंर्गत राज्यस्तरापासून ते ग्रामस्तरापर्यत कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर मनुष्यबळ उपलब्ध करण्यात येत आहे. अशा कंत्राटी पध्दतीने उपलब्ध होणा-या मनुष्यबळास नियमित दौरे करावे लागतात त्यासाठी त्यांना विमा संरक्षण देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणा-या सर्व अधिकारी /कर्मचा-यांचा अपघात विमा काढण्यात येईल. यासाठी देय असलेली रक्कम अभियानातून खर्च करण्यात येईल. राज्य मिशन व्यवस्थापन कक्ष बाजारातील उपलब्ध *पॉलिसींचा* अभ्यास करुन सर्वांसाठी एक उत्कुष्ट *पॉलिसीची* निवड करेल व त्यानुसार कंत्राटी अधिकारी/कर्मचाऱ्यांचा विमा काढला जाईल.

राज्य मिशन व्यवस्थापन कक्षात कार्यरत निम्न व्यावसायिक यांना वर्ग-३ चे तसेच तालुकास्तरावर कार्यरत विस्तार अधिकारी यांना तालुकास्तरीय तज्ञ यांच्या दराप्रमाणे भत्ते अनुज्ञेय राहतील.

वरीलप्रमाणे सर्व भत्ते अभियानांतर्गत प्रतिनियुक्तिने रुजू झालेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांना ते ज्या दिनांकापासून रुजू झाले आहेत त्यांना त्या दिनांकापासून पूर्वलक्षी प्रभावाने देय राहतील. यापुढे अभियानांतर्गत रुजू होणारे अधिकारी कर्मचारी यांना त्यांच्या संवर्गानुसार भत्ते लागु राहतील. वरील प्रमाणे अदा करावयाच्या सर्व भत्ते व इतर अनुषंगिक बाबीसाठी होणारा खर्च हा महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत उपलब्ध होणा-या निधीतून करण्यात येईल.

सदर आदेश हा मनुष्यबळ संसाधन धोरण निश्चित होई पर्यत लागु राहील व त्यानंतर सदर आदेश हा मनुष्यबळ संसाधन धोरणात अंतर्भुत करण्यात येईल. वरील भत्ते अदा करण्याचा अंतिम अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

(श्रावण हर्डीकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

प्रत

१. मा. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई
२. उपसचिव, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई
३. अतिरिक्त संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे, रत्नागिरी, नंदुरबार, सोलापूर, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, उस्मानाबाद व जालना
५. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ठाणे, रत्नागिरी, नंदुरबार, सोलापूर, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, उस्मानाबाद व जालना
६. श्री/श्रीमती ----------------------------------, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई

प्रपत्र अ

आदेश क्रमांक MSRLM/HR/ /२०१३ याचे जोडपत्र आहे.

Maharashtra State Rural Livelihoods Mission (MSRLM)

Tentative Tour Program (TTP)

Month------------------- 2013

Name -- Designation ---------------------------

Sr. No.	Date	Travel		Place of Visit	Purpose of Visit	Mode of Travel	Travel booking by Self or office	No of Day's Stay	Accommodation @ Hotel/ Guest House/ Other
		From	To						

Signature

Name

Designation

To,

Mr. /Ms. ---------------------

Your advance tour program is approved.

Chief Executive Officer

Maharashtra State Rural Livelihoods Mission (MSRLM

प्रपत्र ब

आदेश क्रमांक MSRLM/HR/ /२०१३ याचे जोडपत्र आहे.

Maharashtra State Rural Livelihoods Mission (MSRLM)

Tour diary and Claim Form

ame -- Designation -------------------------- Month ----------------- 20

Date	Intercity Travel			Local Travel			Work Done	Boarding (Yes/No)	Expenditure						
	From	To	Mode of Travel	From	To	Mode of Travel			D.A.	Lodging Expenses	Travel Expenses			Miscellanies Incidental	Total Expenditure (11+12+15+16=17)
											Local	Intercity	Total		
2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17
Total Expenditure															
Advance Taken															
Balance Payable / Refund amount															

Certified that the claim has not preferred previously. 2) Certified that I have not been provided free boarding & lodging during tour. 3) Certified I have not been provided any mode of free conveniences for the journey.

Signature:
Name:
Designation:

Approved By

Chief Executive Officer
aharashtra State Rural Livelihoods Mission (MSRLM

Verified & Counter signed for

Rs...

1. Certified that this claim has not paid previously
2. Certified that no advance pending against the individual

Signature:
Name:
Designation: